# साकार

वेडं करीतो भक्तजना सकळा
पंढरीचा राणा विठोबा सावळा

जगदीश भरी नाथाघरी पाणी
आणी विमान नेण्या तुकया वाणी

गीतामृत वदवी ज्ञानदेवा मुखी
नामामृत ओती जनी नाम्यासाठी

करी जोहार जेवी चोख्यासंगती
मोरोबांना मिळवी मोहरांची पावती

सखू मुक्ता जनाबाईचा आधार
योगी संतांचे तोची ब्रह्म साकार

- नारायण
१२/१२/०९